Total No. of Printed Pages:# 2

# Examination October 2020

## B.A. T.Y. (Sem-VI)

## 1048 Marathi (Opt.) -XIV Vyakran & Nibandh Lekhan

**Time: One Hour** **Max. Marks: 25**

Instructions

Solve any 25 questions from Q.1 to Q.30

1 एकमेकांशेजारी येणारे वर्ण एकमेकात मिसळताना जर स्वर असतील तर त्याच्या एकत्रिकरणाला काय म्हणतात.

(A)स्वरसंधी (B)सीमासंधी (C)स्वरघात (D)नासिक्यरंजन

2 वाक्यात येणाऱ्या शब्दापैकी जे शब्द प्रत्यक्षात असलेल्या किंवा काल्पनिक वस्तूंची किंवा त्याच्या गुणांची नावे असतात, त्यांना काय म्हणतात

(A)क्रियापद (B)क्रियाविशेषण (C)रुपिका (D)नाम

3 अलंकाराचे प्रकार किती आहेत.

(A)पाच (B)चार (C)दोन (D)तीन

4 पारंपारिक व्याकरणात शब्दांच्या जाती किती आहेत.

(A)आठ (B)सात (C)चार (D)तीन

5 एकत्र येणाऱ्या वर्णातील पहिला वर्ण विसर्ग तर दुसरा वर्ण व्यंजन किंवा स्वर असतो तेव्हा होणाऱ्या संधीला काय म्हणतात.

(A)स्वरसंधी (B)विसर्गसंधी (C)बलाघात (D)व्यंजनसंधी

6 दोन स्वर एकत्र येऊन काय तयार होते.

(A)वाक्य (B)व्यंजन (C)जोडाक्षर (D)संयुक्त स्वर

7 सूर्य उगवला झाडीत...

झाडूवाली रस्ता झाडीत.

शिपाई गोळया झाडीत...

अन् वाघहि तंगडया झाडीत...

हे उदाहरण कोणत्या अलंकाराचे आहे.

(A)श्लेष (B)अनुप्रास (C)यमक (D)उपमा

8 दोन वस्तूमधील साम्य चमत्कृतिपूर्णरीतीने जेथे वर्णन केलेले असते तेथे कोणता अलंकार होतो.

(A)उत्प्रेक्षा (B)उपमा (C)रुपक (D)अन्योक्ती

9 एखाद्या वाक्यात किंवा कवितेच्या चरणात एकाच अक्षराची पुनरावृत्ती होऊन त्यातील नादामुळे जेव्हा त्याला सौंदर्य प्राप्त होते,तेंव्हा कोणता अलंकार होतो.

(A)अनुप्रास (B)स्वभावोक्ती (C)यमक (D)श्लेष

10 निसर्गातील निर्जीव वस्तू सजीव आहेत अशी कल्पना करुन ती मनुष्याप्रमाणे वागतात किंवा कृती करतात असे जेथे वर्णन असते तेथे कोणता अलंकार होतो.

(A)व्याजोक्ती (B)असंगती (C)व्याजस्तुती (D)चेतनगुणोक्ती

11 ज्याच्याबद्दल बोलायचे त्याच्याबद्दल काहीच न बोलता दुसऱ्याबद्दल बोलून आपले मनोगत व्यक्त करण्याची जी पद्धत आहे, तिला काय म्हणतात.

(A)पर्यायोक्ती (B)अन्योक्ती (C)व्यतिरेक (D)विरोधाभस

12 गणपत वाणी विडी पिताना, चावायचा नुसतीच काडी;म्हणायचा अन् मनाशीच की, हया जागेवर बांधिन माडी.हे उदाहरण अलंकारामधील कोणत्या प्रकारचे आहे.

(A)स्वभावोक्ती (B)अन्योक्ती (C)विरोधाभास (D)दृष्टान्त

13 ज्या समासातील दोन्ही पदे अर्थदृष्टया प्रधान म्हणजे समान दर्जाची असतात, तेव्हा कोणता समास होतो.

(A)बहुव्रीही समास (B)तत्पुरुष समास (C)द्वंद्व समास (D)अव्ययीभाव समास

14 द्वंद्व समासाचे किती प्रकार आहेत.

(A)पाच (B)तीन (C)चार (D)दोन

15 ज्या समासातील दुसरे पद महत्वाचे असते व अर्थाच्यादृष्टीने गाळलेला शब्द किंवा विभक्तीप्रत्यय विग्रह करताना घालावा लागतो तेव्हा कोणता समास होतो.

(A)अव्ययीभाव समास (B)द्वंद्व समास (C)बहुव्रीही समास (D)तत्पुरुष समास

16 कोणत्या शब्दाचा अर्थ बांधणे, गुंफणे जुळविणे असा आहे.

(A)कथा (B)कविता (C)निबंध (D)नाटक

17 सामासिक शब्दातील दोन्ही पदे महत्वाची नसून या दोन पदांशिवाय तिसऱ्याच पदाचा बोध होतो, तेव्हा कोणता समास होतो.

(A)बहुव्रीही (B)अव्ययीभाव (C)तत्पुरुष (D)द्वंद्व

18 समासाचे मुख्य किती प्रकार आहेत.

(A)चार (B)तीन (C)पाच (D)सात

19 ज्या समासाचे पहिले पद नकारदर्शक असेल तेव्हा कोणता समास होतो.

(A)व्याधिकरण बहुव्रीही (B)नत्र बहुव्रीही (C)सहबहुव्रीही (D)विभक्ती बहुव्रीही

20 आजन्म,यथाशक्ती,प्रतिदिन, प्रतिक्षा ही उदाहरणे कोणत्या समासाची आहेत.

(A)बहुव्रीही (B)तत्पुरुष (C)अव्ययीभाव (D)द्वंद्व

21 संधीचे किती प्रकार आहेत.

(A)पाच (B)तीन (C)दोन (D)चार

22 वैचारिक निबंध लेखनामध्येकोणत्या गोष्टीला प्राधान्य असते.

(A)वर्णन (B)कथन (C)विचार (D)भावना

23 जोडशब्द तयार करताना पहिल्या शब्दातील शेवटचा वर्ण व दुसऱ्या शब्दातील पहिला वर्ण हे एकमेकांत मिसळतात व त्या दोहोंबद्दल एक वर्ण निर्माण होतो.वर्णाच्या अशा एकत्र येण्याला काय म्हणतात.

(A)अलंकार (B)समास (C)अव्यये (D)संधी

24 एकमेकांशेजारी येणारे वर्ण हे स्वरांनी जोडले असतील तर तेव्हा कोणती संधी होते.

(A)स्वर संधी (B)व्यंजन संधी (C)विसर्ग संधी (D)पूर्वरुपसंधी

25 कधी कधी दोन स्वर एकापुढे एक आले असता त्यातील पहिला स्वर न बदलता तसाच राहतो व दुसरा स्वर लोप पावतो, तेव्हा कोणती संधी होईल.

(A)पूर्वरुप संधी (B)पररुप संधी (C)अनुरुप संधी (D)यापैकी नाही

26 एकत्र येणाऱ्या वर्णातील पहिला वर्ण विसर्ग व दुसरा वर्ण व्यंजन किंवा स्वर असतो, तेव्हा कोणती संधी होईल.

(A)स्वर संधी (B)व्यंजन संधी (C)विसर्ग संधी (D)यापैकी नाही

27 जवळजवळ येणाऱ्या दोन वर्णापैकी दोन्ही व्यंजने असतील किंवा पहिला वर्ण व्यंजन व दुसरा वर्ण स्वर असेल, तर त्याला कोणती संधी म्हणतात.

(A)स्वर संधी (B)व्यंजन संधी (C)विसर्ग संधी (D)यापैकी नाही

28 नामाचे प्रकार किती आहेत.

(A)पाच (B)तीन (C)दोन (D)चार

29 सामान्य नामाचे प्रकार किती आहेत.

(A)पाच (B)चार (C)तीन (D)दोन

30 ज्या नामाने प्राणी किंवा वस्तू यांच्यामध्ये असलेल्या गुण,धर्म किंवा भाव यांचा बोध होतो, तेव्हा त्याला काय म्हणतात.

(A)भाववाचक नाम (B)विशेषनाम (C)सामान्य नाम (D)यापैकी नाही